# अर्थपूर्ण

सप्टेंबर २०१३ | ₹ ४०
पुणे, वर्ष ३, अंक ०९

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत

## पतसंवर्धन



# अर्थपूर्ण

**मुख्य संपादक**
**यमाजी मालकर**

**संपादक**
**प्रसाद मिरासदार**

**सहसंपादक**
**सम्राट शिरवळकर**

editor.arthapurna@gmail.com

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
www.arthapurna.org

**सप्टेंबर २०१३**

वर्ष तिसरे
अंक नववा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**अक्षर जुळणी :** माधुरी खत्री

**मुद्रितशोधन :** विजय जोशी
**मुखपृष्ठ :** मंगेश सासवडे

**व्यवस्थापन साहाय्य :**
स्वप्नील भिलारे

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन,
बी १, यशोराम अपार्टमेंट,
४३६-ए, नारायण पेठ,
पत्र्यामारूती गल्ली,
पुणे-४११०३०
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

**वार्षिक वर्गणी व टपालसंबंधी**
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

## अनुक्रमणिका

०६ **जसे शरीरात रक्त, तसे देशात बँकिंग !...**यमाजी मालकर
०८ **दुबळी बँकिंग व्यवस्था**
१४ **एन.पी.ए. अर्थात अनुत्पादक जिंदगी...**गणेश निमकर
१७ **नागरी सहकारी बँकांपुढील मोठे आव्हान...**विद्याधर अनास्कर
२० **ज्याची त्याची बँक...**रवींद्र तांबोळी
२२ **सिस्टिम करप्ट...**प्रसाद मिरासदार
२३ **चिनी राजकीय-आर्थिक तहानी...**परिमल माया सुधाकर
२६ **सरकारी इस्पितळांचे अर्थनियोजन...**श्वेता राऊत - मराठे
३० **घसरलेला रुपया आणि ढासळलेला विश्वास!...**यशराज
३३ **बचत खाते आणि पर्याय...**अरविंद जी. देशमुख
३६ **ओपनिंग रेंज ब्रेकआऊट स्ट्रॅटेजी...**संदीप साठे
३८ **बँकिंग टार्गेटस्...**वंदना धर्माधिकारी
४० **उत्सव, उत्साह आणि बचत...**विजय तरवडे
४२ **निवडणुकीसाठी बिनमहत्त्वाच्या गोष्टी...**अजय महाजन
४४ **सरकारला जाब विचारण्याची योग्य वेळ...**सुनील जोगदेव
४६ **वी वॉन्ट ॲन आयडिया, सरजी!...**कल्याण टांकसाळे
४८ **देशाच्या विकासासाठीचे विमुक्त-विचार!...**विवेक जोशी

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

# जसे शरीरात रक्त, तसे देशात बँकिंग !



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**मोठ्या नोटांमुळे रोखीत सडणारा, सतत अस्थिरतेमुळे सोन्यात अडकलेला आणि पारदर्शकतेअभावी भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारा पैसा म्हणजे खेळत्या हवेला आपल्या ताब्यात ठेवून आपलेच मरण ओढवून घेण्याचा उफराटा व्यवहार आहे. त्या व्यवहारातून बाहेर पडायचे असेल तर चांगल्या बँकिंगशिवाय पर्याय नाही याची 'क्रिसिल'च्या अहवालाने पुन्हा आठवण करून दिली आहे.**

देशातील बँकांनी व्याजदर कमी करावेत आणि विकासाला हातभार लावावा, असे आवाहन अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. पाठोपाठ रिझर्व बँकेनेही ती गरज व्यक्त केली, यात आश्चर्य काही नाही. देशातील भांडवल दिवसेंदिवस इतके महाग होत चालले आहे की असे महागडे भांडवल वापरून उद्योग, व्यापार-व्यवसाय करणे अवघड झाले आहे. विशेषतः चीन, अमेरिकेसारख्या स्पर्धक देशांत दोन आणि चार टक्के इतके स्वस्त भांडवल मिळत असल्याने त्यांच्याशी स्पर्धा करताना भारतीय व्यावसायिक आणि उद्योजक जेरीस आले आहेत. दुसरीकडे स्टेट बँकेसारख्या सर्वांत मोठ्या बँकेच्या अध्यक्षांनी आता व्याजदर आणखी कमी करण्यास असमर्थता दर्शविली आहे. देशात रोखीचे व्यवहार कसे खुलेआम चाललेले आहेत, हे मुंबईत परवा पकडलेल्या नोटांच्या पोत्यांनी, वेळोवेळी सापडणाऱ्या अशा नोटांनी आणि एका निवडणुकीत किमान आठ कोटी रुपये खर्च करावा लागतो, या गोपीनाथ मुंडे यांच्या कबुलीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. ज्या देशातील निम्मी अर्थव्यवस्था अशी रोखीच्या गटाराचे पाणी पिते आणि कसेबसे ४५ ते ४८ टक्केच जनता बँकिंग करते त्या देशात स्वाभिमानी बँकमनीवर तोंड लपविण्याची वेळ येते, यात आश्चर्य ते काय?

व्याजदर कमी केले पाहिजेत, यात शंका असण्याचे अजिबात कारण नाही. पण त्याआधी देशातील बँकिंगची स्थिती काय आहे, हे जाणून घेतले पाहिजे. ज्याला आर्थिक सर्वसमावेशकता (फिनान्शियल इन्क्लूजन) म्हणतात. ती वाढविल्याशिवाय देशातील आर्थिक प्रश्न खऱ्या अर्थाने सुटू शकत नाही, हे आता तरी समजून घेतले पाहिजे. 'क्रिसिल' या प्रसिद्ध आर्थिक संस्थेने २००९ ते २०११ या काळात या विषयवार देशातील सर्व ६३२ जिल्ह्यांचा अभ्यास केला आणि तो अहवाल नुकताच चिदंबरम यांच्याच हस्ते प्रसिद्ध केला. त्या त्या भागातील नागरिकांना प्राथमिक बँक सुविधा मिळतात का, बँक शाखांचा विस्तार किती आहे, खातेदारांची संख्या किती वाढली आहे आणि कर्ज पुरवठ्याचा लाभ किती खातेदार घेतात या निकषांवर आर्थिक समावेशकतेत भारत किती पाण्यात आहे, याचा अभ्यास करण्यात आला. त्याचे निष्कर्ष बोलके आहेत. हे निष्कर्ष समजून घेतले तर व्याजदराची लढाई आपल्या देशात वर्षानुवर्षे का चालली आहे, यासाठी वेगळे काही सांगण्याची गरज पडत नाही.

देशातील मोठ्या सहा शहरांमध्येच ११ टक्के बँक शाखा, ईशान्य भारतातील चार जिल्ह्यांत प्रत्येकी एकच शाखा, बँकेकडून कर्ज घेणाऱ्यांची संख्या लोकसंख्येच्या केवळ ८ टक्के, बँक सुविधा कमी असलेल्या तळातील ५० जिल्ह्यांत लाख खातेदारांमध्ये फक्त दोन हजार ८६१ कर्जदार अशी काही धक्कादायक आकडेवारी त्यातून बाहेर आली आहे. देशात पांढरा पैसा वाढण्यासाठी, आर्थिक विषमता दूर करण्यासाठी, पतपुरवठ्याद्वारे शेती,

व्यापार व्यवसायाला हक्काचे इंधन पुरविण्यासाठी, विभागीय विषमता हटविण्यासाठी आणि एकंदरच देशाच्या विकासात जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी सर्वांत परिणामकारक साधन आहे ते बँकिंग. त्याची अवस्था आज ही आहे. मागे एक बातमी वाचल्याचे मला आठवते, ती अशी की मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत जेवढ्या बँकशाखा आहेत, तेवढ्या बँकशाखा एकट्या पुणे शहरात आहेत ! विकासाचा आणि बँकिंगचा किती जवळचा संबंध आहे, यासाठी हा दाखला पुरेसा आहे.

आज सरकारी आणि खासगी बँकांमध्ये खातेदारांना जे वाईट अनुभव येतात किंवा बँकांना हक्काचे उत्पन्न नसल्याने ज्या प्रकारची लूट काही बँका करतात, त्यामुळे बँकिंगच वाईट, असे म्हणणारे अनेक महाभाग आहेत. मात्र वाढत्या स्पर्धेत बँकिंगमध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत आणि सर्वांनी विश्वास ठेवावा अशा पांढऱ्या पैशांच्या माध्यमातून होणारा विकास बँकिंगशिवाय शक्य नाही, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. शरीरात जे महत्त्व शुद्ध रक्ताला आहे, ते देशाच्या अर्थव्यवस्थेत 'बँकमनी'ला आहे. तो जितका वाढेल, तितका संतुलित विकास होईल. नाहीतर पांढऱ्या पैशांच्या (शुद्ध रक्त) अभावी देश आणखी विद्रूप होत जाईल. वाढत चाललेले नक्षलग्रस्त जिल्हे, वाढत्या विषमतेतून वाढलेली गुन्हेगारी, धन आणि बलशक्तीवर नाचणारे राजकारण, करचोरीची अपरिहार्यता, महागाईमुळे वाढत चाललेली खावखाव... हे सर्व विद्रूप आहे आणि त्याच्या मुळाशी महागडे भांडवल आणि त्याची टंचाई आहे. ही विद्रुपता घालविण्याचा सर्वांत जवळचा मार्ग आहे स्वस्तातील पतपुरवठा.

मोठ्या नोटांमुळे रोखीत सडणारा, सतत अस्थिरतेमुळे सोन्यात अडकलेला आणि पारदर्शकतेअभावी भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारा हा पैसा म्हणजे खेळत्या हवेला आपल्या ताब्यात ठेवून आपलेच मरण ओढवून घेण्याचा उरफाटा व्यवहार आहे. त्या व्यवहारातून बाहेर पडायचे असेल तर चांगल्या बँकिंगशिवाय पर्याय नाही. 'शुद्ध हवेशिवाय' (पांढऱ्या पैशाशिवाय) कोणालाच समाधानाने जगता येत नाही, हे तर खरेच पण हवा खेळती राहिली (पतपुरवठा) तरच ती शुद्ध राहते, याची 'क्रिसिल'च्या अहवालाने




पुन्हा आठवण करून दिली आहे.

शेअर बाजार आणि रुपया कोसळतो आहे आणि सोने वाढते आहे, याचा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. जेव्हा अर्थव्यवस्था संकटात सापडते तेव्हा सोने वाढते. सोन्याची दरवाढ ही जगाच्या अर्थरचनेवरील अविश्वासाचा पुरावा मानला जातो. याचा दुसरा एक अर्थ निघतो, तो म्हणजे लोकांचा या व्यवस्थेवर वर्षानुवर्षे विश्वास नाही! अस्थिरतेने आपल्या सर्वांना ग्रासले आहे. ही अस्थिरता अस्मानी असती तर वाईट वाटण्याचे कारण नव्हते, मात्र ती 'सुलतानी' आहे. म्हणजे माणूस चांगले जगू इच्छितो आणि त्यासाठी मेहनत करण्याचीही त्याची तयारी आहे. मात्र त्याच्या मेहनतीचा भाव कोसळला आहे. पैशीकरणाने त्याच्यातील चैतन्यच हिरावून घेतले आहे. ते परत मिळविण्याचा एक मार्ग आहे तो म्हणजे पैशाला माणसाने विनिमयाचे माध्यम म्हणून जन्माला घातले होते, याची आठवण ठेवण्याचा. ती आठवण ठेवायची म्हणजे गेल्या काही वर्षांत त्याने जो गोंधळ घातला आहे, तो आटोक्यात आणण्यासाठी त्याच्या मुसक्या बांधून त्याला 'बँकिंग'च्या रिंगणात पळविण्याचा !

**'क्रिसिल'च्या अहवालातील चार सकारात्मक निष्कर्ष**

१. आर्थिक सर्वसमावेशकतेचा 'इंक्लूसिक्स' इंडेक्स २०११ मध्ये ४०.१ वर गेला, जो २०१० मध्ये ३७.६, तर २००९ मध्ये ३५.४ होता.
२. सर्वसामावेशकतेच्या मोहिमेत बँकांनी ग्रामीण भागात तीन कोटी खाती उघडली आहेत. त्यामुळे त्या भागातील बँकिंग आता १३ टक्क्यांवर पोचले आहे.
३. आधार कार्डच्या माध्यमातून जनतेला बँकिंगशी जोडण्याच्या मोहिमेला यश येत असून इतक्या कमी काळात तीन कोटी खाती सुरू होणे, हे फक्त भारतातच शक्य झाले आहे.
४. बँकिंगमध्ये मागे असलेल्या शेवटून ५० जिल्ह्यांतील बचत खातेदारांची संख्या वाढली आहे. प्रत्येक बँकशाखेत मार्च २००९ अखेर सरासरी ४,९१९ खातेदार असत, ती संख्या मार्च २०११ अखेर ६,०७३ म्हणजे २० टक्क्यांनी वाढली आहे.